# हरभऱ्यावरील किडी

| | | |
|---|---|---|
| **घाटेअळी**  | लहान अळया सुरुवातीला कोवळी पाने कुरतडून खातात. हरभऱ्यास घाटे भरल्यानंतर घाटे कुरतडून त्यास भोक पाडते. व आत डोके खुपसून आतील दाणे फस्त करते. एक घाटेअळी ३०-४० घाटयाचे नुकसान करते. | एकात्मिक कीड व्यवस्थापन पध्दत वापरावी. |

**एकात्मिक कीड व्यवस्थापन :**

**पीक लागवडी अगोदर :**

- योग्यवेळी पेरणी केल्यास किडींचा उपद्रव कमी होतो. म्हणून कोरडवाहू हरभरा २० सप्टेंबर ते १० ऑक्टोबर तसेच बागायती हरभरा २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबरपर्यंत पेरावा.
- पिक दाट झाल्यास किडींची संख्या वाढते म्हणून शिफारस केलेल्या वाणांची पेरणी ३० x १० से.मी. अंतरावर करावी. जमीन तसेच बियाण्यामार्फत प्रसार होणाऱ्या रोगांच्या नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा या बुरशीची ५ ग्रॅम / किलो या प्रमाणे बीजप्रक्रिया करावी तसेच नत्राच्या उपलब्धतेसाठी २५० ग्रॅम रायझोबियम जिवाणू संवर्धन प्रति १० किलो बियाणे याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी.
- हरभरा पिकाबरोबर गहु, मोहरी, जयस, कोथंबीर ही पीके मिश्र अथवा आंतरपिके म्हणून घेतल्यास किडींचा प्रादुर्भाव कमी होतो. हरभरा पिकांसोबत सिलेक्शन-३ जातीचे ज्वारीचे १०० ग्रॅम दाणे मिसळून पेरल्यास फायदा होतो.

**पीक लागवडीनंतर :**

- पिक १ महिन्याचे होण्यापूर्वीच कोळपणी, निंदणी करुन तण विरहीत ठेवावे. पिकात १ महिन्यानंतर पिकांपेक्षा अधिक उंचीचे आकाराचे एकरी २० मचाणपक्षांना बसण्यासाठी रोवावे.
- वेळोवेळी अळया वेचून नष्ट कराव्यात.
- घाटेअळीचे नियंत्रण तसेच सर्वेक्षणासाठी एकरी दोन कामगंध सापळे पिकांत उभे करावेत.

- एक मीटर लांब ओळीत दोन अळया अथवा कामगंध सापळयात २-३ दिवस ८-१० पतंग आढळल्यास ती किडीची आर्थिक नुकसानपूर्व संकेत पातळी समजावी आणि त्यावेळेस ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.
- ५ टक्के घाटे अळींमूळे किडग्रस्त झाले असतील किंवा घाटे भरण्याच्यावेळी
- एक झाडावर एक अळी किंवा प्रति मीटर ओळीत दोन अळया दिसल्यास एचएनपीव्ही (हेलीओकिल) या विषाणूची फवारणी करावी. परत १५ दिवसांनी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.
- ५ टक्के पेक्षा घाटे किडग्रस्त आढळून आल्यास रासायनिक किटकनाशकाची फवारणी करावी.